# Akshardhara Research Journal

## March-April 2025

## VOL -01 ISSUE-V

Akshara Publication
Plot. 42 Akshara Publication Gokuldham Residency
Prerna Nagar Wanjola Road Bhusawal Dist.Jalgaon [M. S.] India 425201

# Akshardhara Research Journal

Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal

**E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V**



## -: Chief Editor:–

**Dr Priyanka J. Mahajan**

Co-1110/6 Mamaji Talkies area Juna Satara Bhusawal,
Dist. Jalgaom (M.S) India Pincode 425201
Website: https://admrj.com
E-mail : admrj0404@gmail.com

## -: Executive Editor & Publisher :–

**Dr. Girish S. Koli**

42 Akshara Publication Gokuldham Preranangar Wanjola
Road Near Star Lone Bhusawal Dist. Jalgaon
[M. S.] India 425201
**Mobile No: 9421682612**

## Member Of Editorial Board

**DR. E.G. WAJIRA GUNASENA**
Designation : Senior Lecturer (I) In Hindi
Address : Department of Languages, Cultural Studies and Performing Arts University of Sri Jayawardenepura, Nugegoda, 10250, Sri Lanka
Mobile : 0094 112758315
Email Id : wajiragunasena@sjp.ac.lk

**DR. VIVEK MANI TRIPATHI**
Designation : Assistant Professor
Address : Faculty of Afro – Asian Languages and Cultures, Guangdong University of Foreign Studies, Guangzhou, Guangdong, China.
Mobile : 86-18666279640
Email Id : 2294414833@qq.com

**Dr. Girish Kumar Painoli**
Designation : Professor
Address : School of Commerce and Management, Aurora Deemed to be University, Hyderabad India Pin Code:500098
Mobile : 07674938785
Email Id : girishkumar@aurora.edu.in

**Dr.VIVEK ARUN JOSHI**
Designation: Assistan Professor
Address: TES's Institute of Management and Career Development, Bhusawal, Dist. Jalgaon [M. S.] India Pin Code: 425201
Mobile: +91 9881716287
Email Id : admin@ssgbhindimv.com



**ADRJ Disclaimer :**

*For the purity and authenticity of any statement or view expressed in any article. The concerned writers (of that article) will be held responsible. At any cost member of ADRJ editorial Board will not be responsible for anyconsequences arising from the exercise of Information contained in it.*

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

08

# तुका झालासे कळस...!

**प्रा.डॉ.गणेश भि.मोहोड**
(सहयोगी प्राध्यापक) मराठी विभाग व कला शाखा प्रमुख,
नारायणराव काळे स्मृती मॉडेल कॉलेज, कारंजा (घाडगे)जिल्हा – वर्धा

---

**गोषवारा :-**

संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासात संत परंपरेला अतिशय मौलिक स्थान आहे. तसेच त्यांच्या भागवत संप्रदायालाही अतिशय महत्त्वाचे व मानाचे स्थान आहे.संतांची एक महान परंपराच महाराष्ट्राला लाभलेली आहे. अगदी बाराव्या शतकातील संत ज्ञानेश्वर महाराजांपासून ही उज्वल व दैदिप्यमान परंपरा सुरू होऊन सतराव्या शतकातील संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांपर्यंत ही संत परंपरा अविरत झळकताना दिसून येते.या संत परंपरेने महाराष्ट्राला मोठे सांस्कृतिक संचित देऊन महाराष्ट्राच्या इतिहासाला समृद्ध करण्याचे काम संतांनी केले. तसेच वारकरी संतांनी महाराष्ट्रात संस्कृतीरक्षणाचेही मोठे कार्य केले. महाराष्ट्राच्या इतिहासाला वळण लावण्याचे सतत प्रयत्न येथील संतांनी केले. महाराष्ट्राच्या इतिहासात संतांनी धर्मसुधारणा, समाजसुधारणा तसेच भाषासुधारणा करण्याकरिता अथक परिश्रम घेतले. महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे जे अप्रतिम धर्म मंदिर उभारले गेले त्याचे वर्णन बहिणाबाईंनी अतिशय सुंदर अशा शब्दात केलेले आहे.या सर्व सुधारणांचा पाया संत ज्ञानेश्वर महाराज यांनी रचला तर त्यावर कळस संत तुकाराम महाराज यांनी चढविला ते खरेच आहे.

संत कृपा झाली l इमारत फळा आली ll
ज्ञानदेवे रचिला पाया l उभारिले देवालया ll
नामा तयाचा किंकर l तेने केला हा विस्तार ll
जनार्दन एकनाथ l खांब दिला भागवत ll
तुका झालासे कळस l भजन करा सावकाश ll
बहिणी फडकते ध्वजा l निरूपण आले ओजा ll

आपल्या काव्यपंक्तीतून बहिणाबाईंनी अशा प्रकारे सर्वच संतांच्या कार्याचा गौरव केला आहे.ज्ञानदेवे रचिला पाया l तुका झालासे कळस अशी वारकरी पंथाच्या भक्तिमंदिराची जडणघडण या दोन महान संतांनी केलेली आहे.त्यातही संत तुकोबांच्या कार्याला कळसाचा मान त्यांनी दिला आहे .मराठी भाषेचा,मराठी साहित्याचा मराठी संस्कृतीचा,मराठी माणसांचा आणि मराठी मनाचा मानबिंदू म्हणून आपण संत तुकाराम महाराजांकडे बघतो. वारकरी पंथाच्या जडणघडणीत तुकोबांचा मोलाचा वाटा आहे.

**बीजशब्द** :- परंपरा, मौलिक, भागवत, संतपरंपरा, संप्रदाय, कळस, धर्ममंदिर, जडणघडण, वारकरी, पाखंड, आध्यात्मिक, लोकशाही.

**प्रस्तावना :-**

वारकरी संतांनी आपल्या वाट्याला आलेला जीवनयोग स्वीकारून परमार्थाची वाटचाल अधिक सुकर केली. आपली स्वतःचा भक्तिमार्ग निश्चित करून सर्वच संतकवीं मोक्षाचे धनी झालेत. आत्मोध्दार करणे व लोकोध्दार करणे या निखळ प्रेरणेतून संतकाव्याची निर्मिती झालेली दिसून येते. मध्ययुगीन महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन हे धर्मप्रधान होते.त्यामुळे नाथसंप्रदाय,वारकरी संप्रदाय व महानुभाव संप्रदायाचा प्रभाव बऱ्याच अंशी तत्कालीन समाजमनावर व समाजजीवनावर होणे क्रमप्राप्त होते .मराठी भाषेत संत वाङ्मयाच्या लेखनास बाराव्या शतकाच्या पूर्वार्धापासूनच आरंभ झालेला दिसतो. त्यामुळेच ही परिस्थिती महाराष्ट्राच्या अभुदयास व मराठी भाषेच्या विकासास कारणीभूत ठरली.त्यातूनच उत्तमोत्तम साहित्यकृतींची निर्मिती या कालखंडात झालेली दिसून येते. संतांनी आध्यात्मिक क्षेत्रात पारंपारिक लोकशाहीची स्थापना केली आहे.

वारकरी संप्रदायातील संत एकाच संप्रदायातील असूनही त्या सर्वांच्या रचना मात्र स्वतंत्र आहेत. डॉ. उषा मा.देशमुख लिहितात, " ज्ञानदेव आदर्शवादी होते,नामदेव नामस्मरण प्रचारक होते, एकनाथ समन्वयवादी होते तर तुकाराम आक्रमक विद्रोही होते. त्याचेच समकालीन रामदास विरवृत्तीचे पुजारी होते. सर्व पंथांच्या संतांची भूमिका ही पुरोगामी समाजशिक्षकाचीच होती.हे लक्षात ठेवून संतकाव्याचे मूल्यमापन केले गेले पाहिजे. प्रमुख संतांनी आपल्या काळात स्वतःबरोबर समाजातील विविध स्तरातील स्त्री-पुरुषांचाही उद्धाराचा मार्ग अवलंबिला आहे आणि अशा प्रकारे ' अध्यात्मिक लोकशाही 'चा आदर्श सातत्याने टिकवून ठेवलेला आहे. स्त्रीशूद्रांना केवळ पंथात स्थान दिले असे नाही तर त्यांचाही गौरवाने उल्लेख केला आणि भक्तांच्या मांदियाळीत त्यांना अग्रस्थान दिलेले दिसते. वारकरी पंथातील अखेरचे संत म्हणून तुकाराम महाराजांचे नाव घ्यावे लागते. देहू येथील मराठा कुणबी घराण्यात जन्म झाला पण वेदांचा अभ्यास त्यांनी केलेला होता.

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

तुकाराम महाराजांचे अभंग म्हणजे त्यांचे आध्यात्मिक चरित्र आणि आत्मचित्र होय. पराकोटीची आत्मनिष्ठा आणि प्रामाणिकपणा हे त्यांच्या अभंगांचे विशेष होत."१

संत तुकारामांना जीवन जगताना तर अनेक दिव्यातून जावे लागले .त्यांचे संपूर्ण आयुष्यच संघर्षमय आहे. त्यांचे संपूर्ण आयुष्यच अंतर्बाह्य झगड्यांनी भरले आहे.ते म्हणतात,

"रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग l अंतर्बाह्य जग आणि मन ll"

जग,प्रपंच,मन,व्यवहार आणि ईश्वर या सर्वांबरोबर त्यांचा सतत संघर्ष सुरू होता .अनेक असह्य आपत्तीतून ते तावूनसुलाखून आल्यामुळे त्यांना जगाचा मोठा विदारक अनुभव आला होता . रात्रंदिंन आम्हा युद्धाचा प्रसंग l अंतर्बाह्य जग आणि मन l l त्यांचे सारे आयुष्यच अंतर्बाह्य झगड्यांनी भरलेले आहे. संत तुकारामाच्या वाणीत संसाराचा आणि जगाचा अनुभव साठविलेला आहे.

संवसारे झालो अतिदु:खे दुःखी l मायबाप सेखी क्रमिलिया ll २ ll
दुष्काळी आटिले द्रव्य नेला मान l स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ll
लज्जा वाटे जीवा त्रासालो या दुःखे l वेवसाय देखे तुटी येता ll ४ll

अशी लौकिक जीवनात झालेली एका मागोमाग वाताहत व नैसर्गिक आपत्ती कोसळल्यानंतर तुकोबा संसाराला वैतागणे स्वाभाविक होते. अंत:करणात येणारे कढ ते सतत बोलून दाखवत असत आणि म्हणूनच त्यांचे अभंग अधिक जवळचे आणि जिव्हाळ्याचे वाटतात .तत्कालीन समाजाचे भले व्हावे,हाच त्यांचा मुख्य हेतू होता.तुकोबांची भाषा परखड असली तरी त्यामागची त्यांची भावना शुद्ध होती. भक्तीभावनेने रेखाटलेले चित्र असो अथवा प्रापंचीकांना केलेला हितोपदेश असो की, परखड पाखंड खंडन असो सर्वच बाबतीत तुकारामांचे बोल प्रत्यक्ष हृदयाला जाऊन भिडतात.

बुडते हे जन न देखावे डोळा l येतो कळवळा म्हणून याll हीच साक्षेपी भूमिका त्यांच्या जीवनातून व भागातून व्यक्त झालेली दिसते. लौकिक पातळीवरील समाज जीवनाशी देखील तितक्याच समरसतेने संबध झालेले त्यांचे चरित्र दिसते. त्यांचे लौकिक जीवन हे अभावांनी भरलेले होते. ' आपुलाची वाद आपणाशी ' या न्यायाने स्वतःशी संघर्ष आणि संवाद करीत ही आत्मसाधना आणि अभंगसाधना अव्याहतपणे चालू होती. बा. रं.सुंठणकर त्यांच्या ग्रंथात लिहितात, " तुकारामांच्या जीवनचरित्राची यथायोग्य कल्पना त्यांच्या अभंगावरूनच येते. ते शूद्र वाणी होते. शूद्र व वाणी या दोन्ही वर्गाचे गुण त्यांच्या अंगी होते. आपत्तीतून तावून सुलाखून आल्यामुळे त्यांना जगाचा अनुभव खूप आला होता. समाजाचे, समाजातील निरनिराळ्या थरांचे आणि त्यातील श्रेष्ठ- कनिष्ठ व्यक्तींचे आचारविचार यांचे सूक्ष्म निरीक्षण त्यांनी केले होते. याला त्यांचे सारे अभंग साक्ष आहेत. त्यांचे अभंग बारकाईने वाचले म्हणजे तुकाराम हे भोळसट देवपिसा होते ही कल्पना टाकून द्यावी लागते. ते व्यवहारचतुर आणि समाज निरीक्षक होते यात शंकाच नाही. ते खरेखुरे वाणी होते; पण गोडबोल्या नव्हे, तर स्पष्टोक्ती करणारे वाणी होते. त्यांच्या नंतरच्या भक्तांनी आणि चरित्रकारांनी त्यांना भोळसट ठरविलेले दिसते ! पण भोळसटपणाचा त्यांच्यावर हा निव्वळ आरोपच आहे. त्यांच्यात भोळसटपणा नव्हता, तर संसाराच्या वैतागाने त्यांच्यात औदासीन्य निर्माण झाले होते. वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांच्या वडिलांनी त्यांना व्यापाराला आणि संसाराला जुंपले. " २

मुळातच तुकारामाची वृत्ती व भाषा अतिशय सडेतोड व विद्रोहाची होती.संत तुकाराम महाराजांनी केलेली लोकजागृती समाजाभिमुख असल्याने ती लोकांना अतिशय भावली व त्यांना मोठी प्रसिद्धीही मिळाली.त्यांचे अभंग रसाळ आणी जिव्हाळ्याचे वाटतात. या मराठी संत मंडळात काळाच्या दृष्टीने पहिल्याच संत तुकोबा हे अखेरचे श्रेष्ठ संत ठरतात. त्यांचे सर्वच अभंग हे एकाहून एक सरस व त्यातील अनुभव हे त्यांच्या समृद्ध विचारांची द्योतक आहेत. आणि म्हणूनच त्यांची अभंगवाणी गेले तीनशे साडेतीनशे वर्ष मराठी मनावर अधिराज्य गाजवित आहेत. त्यांचे सर्वच अभंग हे कळस ठरणारे आहेत. संत तुकारामांच्या वाणीमध्ये एक वेगळेच तेज, सत्व आणि प्रामाणिकपणा आहे. अवतीभवतीच्या सामाजिक परिस्थितीचे त्यांचे अतिसूक्ष्म अवलोकन व निरीक्षण होते.दृष्टी स्वच्छ आणि पारदर्शी होती. ते अतिशय डोळस व संवेदनशील मनाचे होते.अनुभवाशिवाय ते बोलत नव्हते .या अनुभवातून आलेली सत्ये वारंवार तपासून जी निखळ सत्ये बाहेर पडत तीच त्यांच्या अभंगातून मांडलेली आहे.सत्यासाठीच त्यांची धडपड होती. त्यांची ज्ञानप्राप्तीची धडपड ही सत्यान्वेषासाठीच होती. ऐहिक आणि पारलौकिकाचा एकाच वेळी वस्तुनिष्ठपणे समन्वय साधणारा तुकोबांचा विशाल दृष्टिकोन होता. " तुकोबांच्या गाथेचे वैश्विक स्वरूप बघता जगातले सर्वच विषय तुकोबांनी हाताळलेले आहेत. तुकोबा खरे तर जगातले आदिम असे तत्वज्ञ , शास्त्रज्ञ आणि संशोधक आहेत, असे म्हणता येते. मानवी जीवनातील सबंध अवकाशाला तुकोबांनी हात घातलेला होता. म्हणूनच तुकोबांना, अणूरनीया थोकडा, तुका आकाशाएवढा - अशी अनुभूती आली असावी. तुकोबांच्या चरित्राचे प्रमाणित साधन म्हणून संत बहिणाबाई शिऊरकरांची अभंगगाथा मानली जाते. महिपती, गोपाळबाबांचे अभंग अशी काही जुनी साधने उपलब्ध आहेत. परंतु ही साधने एकतर त्रोटक आहेत किंवा तुकोबांभोवती अलौकिकतेचेच केवळ वलय निर्माण करण्याचा हेतू निर्देशित करणारी आहेत. तरीही तुकोबांच्या चरित्रावर ह्या साधनांनी

बराच प्रकाश टाकला हे मान्य करावे लागते. विशेषतः बहिणाबाईंची अभंगगाथा हेच खरेतर तुकोबांच्या चरित्राचे एकमेव विश्वास ठेवावे असे साधन आहे. " ३

संत एकनाथ महाराज यांच्या निर्वाणानंतर ९ वर्षांनी म्हणजेच शके १५३० सन १६०८ ला देहू या गावी तुकोबांचा जन्म झाला.त्यांचे बालपण आई वडिलांच्या छत्र छांयेखालीच गेले. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षीच त्यांचा विवाह झाला. शेतीवाडी, महाजनी,व्यापार,उद्योग,सावकारी असल्यामुळे घराण्यात अतिशय समृद्धीच होती.सर्वकाही सुरळीत चालू असताना नियतीच्या मनात मात्र काही वेगळेच चालू होते. भरल्या संसाराला दृष्ट लागली.आणि सर्व होत्याचे नव्हते झाले.महाभयंकर पडलेला दुष्काळ.कर्जबाजारीपणा, त्यामुळे सर्व संसाराची झालेली वाताहत. त्यांच्या सावकारीचेही दुष्काळामुळे दिवाळे निघाले होतेच.त्यातच आई वडिलांचा, लाडक्या पुत्राचा व पत्नीचा झालेला मृत्यू. तसेच एकापाठोपाठ जवळच्या जिवलग आप्तस्वकीयांचे झालेले मृत्यू .या सर्व यातून त्यांना मोठी निराशा आली .जीवनात भयंकर एकाकीपणा निर्माण झाला .सर्वच होत्याचे नव्हते झाले .त्यांचा सुखी संसार दुभंगला होता.

बरे झाले देवा निघाले दिवाळे l बरी या दुष्काळी पीडा केली ll१ll
अनुतापे तुझे राहिले चिंतन l झाला हा वमन संवसार ll२ ll
बरे झाले देवा बाईल कर्कशा l बरी हे दुर्दशा जनामध्ये ll३ll
बरे झाले जगी पावलो अपमान l बरे गेले धन ढोरे गुरे ll४ ll
बरे झाले नाही धरीली लोकलाज l बरा आलो तुज शरण देवा ll ५ ll
बरे झाले तुझे केले देवाईल l लेकरे बाईल उपेक्षिली ll ६ ll
तुका म्हणे बरे व्रत एकादशी l केले उपवासी जागरण ll ७ll

(७६९ तु. म.गाथा.पारायण प्रत,गीताप्रेस)

या एकाच अभंगातून त्यांच्यावर आलेल्या परिस्थितीचे विदारक चित्र आपल्या समोर येते. त्यातच पडलेल्या महाभयंकर दुष्काळाने संसाराची घडीच विस्कटली होती.माणसांना जीवन जगणेच कठीण होऊन बसले होते.यातूनच तुकोबांच्या दुर्दशेचा उत्तररंग आयुष्यात सुरू झाला होता .आणि या साऱ्या प्रत्यक्ष अनुभवांच्या चटक्यांमुळेच तुकोबांचे संपूर्ण आयुष्य व भावजीवनच अंतर्बाह्य बदलून गेले.अशा दुःखमय प्रसंगी त्यांच्या अतिशय दुःखी झालेल्या मनाला देवाची ओढ लागली.या दुःखमय संसाराचे सर्व पाश तोडून ते भंडारा डोंगरावर जाऊन अखंड नामस्मरण व चिंतन करू लागले.साधनेत लिन होऊ लागले.

या चिंतनातून त्यांना सर्वसामान्य माणसाच्या आयुष्याकडे अपार करुणेने पाहण्याची नवी दिशा प्राप्त झाली . समाजातील अपर दुःखाने त्यांचे अंतःकरण पोळून निघाले. आपल्या वैयक्तिक सुखदुःखात आपण गुरफटून गेलो याची खंत त्यांना वाटू लागली.त्यांनी बाहेरचे हे दुःख उघड्या डोळ्यांनी अनुभवले आणि ते अंतर्मुख झाले.संपूर्ण अफाट विश्वात माझेही काहीतरी अस्तित्व आहे याचे भान त्यांना आले .आणि हेच भान त्यांच्या काव्याचा विषय झाला. या त्यांच्या अनुभवाद्वारे व्यापक समाजजीवन हा त्यांच्या काव्यनिर्मितीचा विषय बनला."तुकारामांचे लौकिक आणि अलौकिक जीवन हे त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे नानाविध भावाविष्कार त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात. तुकारामांचा खडतर जीवनप्रवासही त्यांच्या कवितेत व्यक्त होतो. सामान्य माणूस म्हणून प्रपंचात जीवन जगणारा तुकाराम, सावकारकी आणि दुकानदारीच्या व्यवसायात स्वतःला गुंतवून घेऊन जगणारा, स्वतःचे एकत्र कुटुंब मोठ्या चिकाटीने चालविणारा, आई,वडील, भाऊ, पत्नी, वहिनी, मुले यांच्यावर भरभरून प्रेम करणारा तुकारामही त्यांच्या कवितेतून व्यक्त होतो. तसेच नातलगांच्या वियोगाने तो अस्वस्थ होतो.काव्यालेखनासाठी कलावंताचे अस्वस्थपण आणि झपाटलेपणही त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. सर्व समाजापर्यंत आपले विचार पोचविणारा दृष्टा कलावंत, काळाची गती ओळखून विठ्ठलाच्या माध्यमातून जनसामान्यांच्या भावना मांडणारा तुकाराम हा वेगळाच जाणवतो. तुकाराम थेट समाज मनाशी संवाद साधतो. कीर्तन संस्थेद्वारे त्यांनी आपली कविता समाजापर्यंत नेऊन पोहचविली. संवाद हे प्रभावी माध्यम कवितेसाठी त्यांनी वापरले आहे. संवादासाठी त्यांनी लोकभाषेचा वापर केला आहे. लोकमानस आणि लोकसंस्कृतीचे विविध अविष्कार त्यांच्या कवितेतून घडतात. त्यामुळे जनसामान्यांना त्यांची कविता अधिकच जवळची वाटते. कृषी संस्कृतीत ते वाढले. त्यामुळे कृषी संस्कृतीचे नानाविध संदर्भ त्यांच्या कवीतून व्यक्त होतात. त्या माणसांच्या भावभावनाही त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात .

तुकारामांची आत्मपर कविता ही भावकवितेच्या रूपात व्यक्त होते. तुकारामांची कविता सामान्य माणसांपासून ते समाजातील सर्वच स्तरातील माणसांना जवळची वाटते. तिच्यातून त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व व्यक्त होते. तुकारामांचे लौकिक आणि अलौकिक जीवन हे त्यांच्या कवितेत व्यक्त झाले आहे. लौकिक जीवनाच्या कडा धूसर होऊन त्या त्यांच्या कवितेत वितळून जातात . मानवी जीवनाचा व्यापक संदर्भ त्यांना प्राप्त होतो. वैश्विक अनुभवाचे स्वरूप प्राप्त होते. तुकाराम जीवनातील वास्तवानुभावला कवितेत मांडत होते. त्यावेळच्या

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / March-April 2025 / VOL -01 ISSUE-V

साहित्यव्यवहाराच्या दृष्टीने हे अतिशय लक्षणीय काम होते. तुकारामांनी हे धाडस केले. मात्र त्याची किंमत त्यांना मोजावी लागली. त्यांना तत्कालीन समाजव्यवस्थेशी संघर्ष करावा लागला. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व अधिकच तावून सुलाखून निघाले " ४

तुकोबांची कविता अधिक धीटपणे समाजवास्तव मांडताना दिसते.त्यात ते कुणाचाही मुलाहिजा ठेवत नाही. त्यांचे काव्य स्पटिकासारखे स्वच्छ आहे. तुकोबांनी समाजात माजलेल्या भोंदूगिरीवर आपल्या वाणीने प्रहार केले व निषेधही केला.प्रतिगामी समाजावर त्यांनी आसूड हाणला.समाजाचा पहारेकरीची भूमिका त्यांनी स्वीकारली. त्यांनी आपल्या काव्यानी समाजातील,खेड्यापाड्यातील सर्वसामान्य माणसाच्या मनात व जीवनात प्राण फुंकले. ' मऊ मेणाहुण आम्ही विष्णुदास I कठिण वज्रास भेदू ऐसे II तुकोबांची वाणी अशा प्रकारे चवताळून उठते .आणि म्हणूनच त्यांचे खडे बोल आजही रसरशीत व जिवंत वाटते .म्हणूनच सर्वसामान्य माणसाला तुकोबांच्या साहित्यात स्वतःचेच प्रतिबिंब दिसते .' भलेतरी देऊ कासेची लांगोटी I नाठाळाच्या माथी II हीच त्यांची रोखठोक भूमिका आहे .त्यांचे समाजचिंतन अतिशय सखोल आणि व्यापक आहे. समाजात असलेला दांभिकपणा, पाखंडीपणा,अपप्रवृत्ती,ढोंगीपणा यावर त्यांनी सडेतोड प्रहार केले .त्यांच्या समाजचिंतनाला विवेकाचे अधिष्ठान आहे.

ऐसे कैसे झाले भोंदू I कर्म करोंनि म्हणती साधू II १ II
अंगा लावूनीया राख I डोळे झांकुनि करिती पाप II २ II
दाऊनि वैराग्याची कळा I भोगी विषयांचा सोहळा II ३II
तुका म्हणे सांगो किती I जळू तयांची संगती II ४II
(३२६८ तु.गा.गीताप्रेस)

समाजव्यवस्थेत असलेली व्यंगे त्यांनी आपल्या कवितेतून मांडली.समाज व्यवस्थेतील उघडेनागडे वास्तव मांडले .ते इथल्या भग्न अवस्थेत असलेल्या समाजव्यवस्थेवर तुटून पडले.तत्कालीन खिळखिळया झालेल्या समाजव्यवस्थेलाच हादरे दिले.तत्कालीन बेगडी धर्मव्यावस्थेचे व भक्तीव्यवस्थेचे भकास आणि विचित्र रूप समाजासमोर स्पष्ट शब्दात मांडले आहे.

मोले घातले रडाया I नाही आसू नाही माया II १II
तैसा भक्तीवाद काय I रंगबेगडीचा न्याय II२II
वेठी धरिल्या दावी भाव I मागे पाळायाचा पाव II ३ II
काजव्याच्या ज्योती I तुका म्हणे नलगे वाती II ४II
(१२९६ तु. म गा.गीताप्रेस)

तुकारामाची काव्यसंपदा ही अंतर्मुख वृत्तीतून निर्माण झाली असल्यामुळे पारमार्थिक जीवनचरित्राचे दर्शन घडते.तद्वतच सामाजिक मनाचे त्यात पडसादही उमटलेले दिसतात. आणि त्यातूनच ' वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा I येरांनी वाहावा व् भार माथा II असे आत्मविश्वासाचे शब्द त्यांच्या वाणीतून बाहेर पडतात. .

**संदर्भ:-**

१. अरविंद दोडे ( संपादक: संकलन) , श्रीतुकारामदर्शन , पृ.१४
२.बा. रं. सुंठणकर,महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य , पृ.६२
३.सानप डॉ.किशोर ,समग्र तुकाराम दर्शन, पृ.१६
४. पाटील डॉ. तानाजी , समाजजीवनातील तुकाराम, पृ.४७,४८

**संदर्भ ग्रंथ:-**

१. अरविंद दोडे (संपादक/ संकलन) श्रीतुकारामदर्शन , सुदर्शन प्रकाशन, वडाळा, मुंबई, प्रथमावृत्ती २००५
२. बा. रं. सुंठणकर , महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य, लोकवाङ्मय गृह,
मुंबई
३.सानप डॉ.किशोर ,समग्र तुकाराम दर्शन,विजय प्रकाशन,नागपूर,२००८
४. पाटील डॉ. तानाजी राऊ, समाजजीवनातील तुकाराम, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २६ जानेवारी २००८
५. मोरे डॉ.सदानंद,,प्रसादाची वाणी...अर्थात तुका म्हणे, सकाळ प्रकाशन, पुणे,प्रथामावृत्ती२०१४
६.पाटील डॉ.सुभाष ,संत तुकाराम आणि रेव्ह. टिळक: एक भावानुबंध,स्नेहावर्धन प्रकाशन, पुण